# बृहन्मुंबई महानगरपालिका

## घन कचरा व्यवस्थापन, पी/दक्षिण

सहा.अभि.(घकव्य)/10715/पी/दक्षिण दिनांक 23/01/2026

## सूचना

विषय: पी/दक्षिण विभागात 'स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान' (वस्ती स्वच्छता योजना) राबविण्याबाबत.

**पी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय हद्दीतील संस्थांना** याद्वारे सुचित करण्यात येते की, घन कचरा व्यवस्थापन पी/दक्षिण विभागातर्फे **'स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान' (वस्ती स्वच्छता योजना)** राबविण्याकरीता एकूण **34** अशासकीय संस्थांची / बचतगटांची सोडत पद्धतीने निवड करुन योजनेच्या अटी व शर्ती नुसार **दि. 01 फेब्रुवारी, 2026 ते दि. 31 जुलै, 2026** या कालावधीकरीता नियुक्ती करण्याचे प्रस्ताविलेले आहे.

अर्ज तसेच योजनेच्या अटी व शर्ती सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण विभाग ह्यांच्या कार्यालयात निशुल्क उपलब्ध असून त्या **दि. 23 जानेवारी, 2026 ते दि. 27 जानेवारी, 2026 पर्यंत सकाळी 11:00 ते दुपारी 04:00 वाजेपर्यंत आणि दि. 28 जानेवारी, 2026 रोजी दुपारी 1:00** वाजेपर्यंत मिळतील. अर्ज भरताना सोबत छाननी शुल्क रु. 1452/- अधिक 18% जीएसटी इतके रोखीने नागरीक सुविधा केंद्रामध्ये भरलेल्याची पावती जोडणे अनिवार्य आहे. इच्छूक अशासकीय संस्थांनी आपले अर्ज सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण यांच्या कार्यालयात **दि. 28 जानेवारी, 2026 दुपारी 04:00 वाजेपर्यंत** सादर करावेत. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधीनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

योजनेच्या अटी व शर्ती नुसार पात्र ठरलेल्या संस्थांपैकी **34 अशासकीय संस्थांची / बचतगटांची दि. 30 जानेवारी, 2026 रोजी दुपारी 02:00 वाजता सोडत पद्धतीने** सदर कामाकरीता निवड करुन कामाची संधी देण्यात येईल. सदर सोडतीस पात्र संस्थांच्या / बचतगटांच्या अध्यक्षांस / पदाधिका-यास उपस्थित रहाणे बंधनकारक असेल. सोडती बाबत सर्व अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घकव्य) पी/दक्षिण**